**म.कौ.हिं.सं.का.अर्ज क्र.१५/२०२२**
(CNR No.MHRT110003142022)
(श्रावणी विरूध्द अभय)

**आदेश नि. ०६ खाली**
(पारित दि. २९/०२/२०२४)

सदरचा अर्ज अर्जदार हिने **महिलांचा घरगुती जुलूमांपासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा, २००५ चे कलम २३** अन्वये अंतरीम आर्थिक मदत मिळविण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदार हिचे कथन** :—

२. सामनेवाला हा तिचा पती असून त्याचे सततचे शारिरीक व मानसिक त्रासापासून संरक्षण मिळण्यासाठी, स्वतंत्र रहाणेची व्यवस्था करणेसाठी, प्रतिमहा आर्थीक मदत म्हणून रक्कम रुपये दहा हजार व आर्थीक नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रूपये पाच लाख बाबत अनुतोष मिळणेसाठी मुख्य अर्ज दाखल केला आहे. तिचा विवाह दि. २१/०२/२०२१ रोजी झाला. अर्जदार हिने मुख्य अर्जामध्ये सामनेवाला याने तीचा कोणत्या प्रकारे कौंटुबीक हिंसाचार केला याचे सविस्तर वर्णन मुख्य अर्जामध्ये केलेले आहे.

२.१ अर्जदार हिने पुढे असे कथन केले आहे की, ती सामनेवाला याची कायदेशीर पत्नी असुन देखील त्याने तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, औषधपाणी या बाबतची जबाबदारी नाकारलेली आहे. सामनेवाला हा गोदरेज कंपनी, भिंवडी येथे नोकरी करत असून त्याला रक्कम रूपये वीस हजार प्रतिमहा पेक्षा जास्त पगार आहे. सामनेवाला याचेवर अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणीही अवलंबून नाही. अर्जदारचा संभाळ करणेची जबाबदारी पुर्णपणे सामनेवाला ची आहे. अर्जदार हिला आर्थीक उत्पन्नाचे अन्य कोणतेही साधन उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे तिच्या माहेरची परिस्थीती देखील हालाखीची आहे.

२.२ मुख्य अर्ज निकाली होणेस बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे अर्जदार हिच्या आर्थीक खर्चाबाबत फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे मुख्य अर्जाच्या निकालापर्यंत अंतरिम आर्थीक मदत म्हणुन रक्कम रूपये दहा हजार अर्जदार यांना सामनेवाला क्र. १ यांनी प्रतिमहा दयावेत या विनंती अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जासोबत प्रतिज्ञापत्र देखील दाखल केलेले आहे.

**सामनेवाला याचे म्हणणे (नि.२५)** :—

३. सामनेवाला याने त्याचे अर्जदार सोबत लग्न झाल्याचे मान्य केले आहे. तसेच सामनेवाला याने अर्जदार हिच्या अर्जातील सर्व कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत. त्याने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला याने अर्जदार हिचा केव्हाही त्याग केलेला नाही. सामनेवाला याने वेळोवेळी अर्जदार हिला पुन्हा नांदावयास नेणेबाबत प्रयत्न केलेले आहेत. परंतु अर्जदार हिने सदर विनंतीस स्पष्टपणे नकार दिला आहे. सामनेवाला याने अर्जदार हिचा केव्हाही शारिरीक किंवा मानसीक छळ केलेला नाही. अर्जदार ही स्वत: घर सोडुन निघुन गेलेली आहे.

३.१ सामनेवाला याला केवळ प्रतिमहा दहा हजार इतके उत्पन्न आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र. १ याचेवर त्याचे वयोवृध्द आईचा खर्च देखील अवलंबुन आहे. सामनेवाला याने केंव्हाही अर्जदार हिची जबाबदारी नाकारलेली नाही. तो आजही अर्जदार हिला घरी घेवून जाणेस तयार आहे. सामनेवाला याने अर्जदार हिचे सांगणेवरुन कर्ज काढलेले होते. त्या कर्जाची परतफेड देखील सामनेवाला करत आहे. तरी सर्व गोष्टींचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कमीतकमी आर्थीक मदत देणेबाबत आदेश पारित करणेत यावा अशी विनंती सामनेवाला यांनी केलेली आहे.

४. अर्जदार हिने नि.२६ कडे तिचे मालमत्ता व दायित्व संबंधीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये तिने तिचा मासिक खर्च रक्कम रू.

१०,०००/— असल्याचे कथन केले आहे. तर सामनेवाला याचे मासिक उत्पन्न रक्कम रू.२०,०००/— असल्याचे कथन केले आहे. सामनेवाला यास वेळोवेळी संधी देवून देखील त्याने मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र हजर केले नाही. त्यामुळे सदरचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचा त्याचा हक्क नि.१ कडे आदेश पारीत करून रद्द करण्यात आला आहे.

५. अर्ज, त्यावरील सामनेवाला याचे म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे युक्तीवाद ऐकला. सामनेवाला याने वेळोवेळी संधी देवून देखील युक्तीवाद केला नाही, म्हणून त्याचा युक्तीवाद करण्याचा हक्क रद्द करण्यात आला आहे.

६. सदर अर्जाच्या निकालार्थी खालीलप्रमाणे विचारार्थी मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित होतात—

| | **विचारार्थी मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार ही सामनेवालाकडून **महिलांचा घरगुती जुलूमांपासून रक्षण करण्या संबंधीचा कायदा, २००५ चे कलम २३** नुसार अंतरीम आर्थिक मदत मिळविण्यास पात्र आहे का ? असल्यास किती ? | :— | होकारार्थी<br>अर्जदार हिला एकूण रक्कम रू. ३,०००/— |
| २. | आदेश काय ? | :— | अर्ज अंशत: मंजूर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता** :—

७. **महिलांचा घरगुती जुलूमांपासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा, २००५ चे कलम २०** नुसार न्यायदंडाधिकारी यांना व्यथीत व्यक्तीच्या आणि व्यथीत मुलीचा कौटूंबीक जुलूमांमुळे झालेला खर्च आणि तिला सोसावे लागलेले नुकसान याबाबत प्रतिपक्षाने व्यथीत व्यक्तीला आर्थिक मदत करावी असा आदेश पारीत करण्यासंबंधी अधिकार देण्यात आलेले आहेत. तर सदर कायदयाच्या **कलम २३** अंतर्गत या कायदयाखाली

न्यायदंडाधिकारी यांना जर योग्य वाटले तर ते आर्थिक मदतीतबाबत अंतरीम आदेश देवू शकतात.

८. अर्जदार व सामनेवाला यांना ते दोघेही नात्याने पती पत्नी असुन ते दोघेही सध्या विभक्त रहात असलेचे मान्य व कबुल केलेले आहे.

९. अर्जदार हिने तिच्यावर झालेल्या घरगुती हिंसाचाराचे सविस्तर वर्णन अर्जामध्ये केलेले आहे. उलटपक्षी सामनेवाला याने सदरचा हिंसाचार घडला नसल्या बाबत कथन केले आहे. परंतु अंतरीम आर्थीक मदतीच्या अर्जाचा विचार करीत असताना अर्जामधील नमुद कथनांचे सकृतदर्शनी अवलोकन करणे आवश्यक आहे. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार व सामनेवाला ह लग्नानंतर एकत्र राहण्यास असल्याची बाब उभय पक्षकारांना मान्य आहे. त्यामुळे सकृतदर्शनी अर्जदार ही लग्नानंतर ज्या घरा मध्ये राहत होती त्याठिकाणी तिच्यावर हिंसाचार झाल्याची बाब दिसून येते. तसेच अर्जदार हिने नि.३०/४ सोबत गुहागर पोलीस ठाणे येथे सामनेवाला क्र. १ याचे विरुध्द दाखल केलेल्या प्रथमखबरी अहवालाची प्रत देखील हजर केलेली आहे, यावरुन देखील सकृत दर्शनी अर्जदार व सामनेवाला यांचे नात्याला हिंसाचाराची पार्श्वभुमी असलेचे दिसुन येते.

९.१ उलटपक्षी अर्जदार हिच्यावर हिंसाचार झाला नाही हे दर्शविण्यासाठी सामनेवाला याने त्याचे लेखी कथनांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा अभिलेखवर आणलेला नाही. सबब मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यन्त अर्जदार ही तिच्यासाठी आर्थीक मदतीचा अंतरीम आदेश मिळविण्यास पात्र आहे. परंतु सदरच्या अंतरीम आर्थिक मदतीबाबत आदेश पारीत करीत असताना सामनेवाला याची कोणती आर्थिक परिस्थिती अभिलेखावर आली आहे याचे सकृतदर्शनी अवलोकन करणे आवश्यक आहे.

१०. अर्जदार हिने सामनेवाला याची आर्थिक परिस्थिती दर्शविण्यासाठी सामनेवाला याचे नांवे असलेल्या मौजे वेलदुर ता.गुहागर

जि.रत्नागिरी येथील सामाईक मिळकतीचे गट क्र. ९०६,९५ चे ७/१२ उतारे हजर केले आहेत. परंतु सदर मिळकतींचे क्षेत्र व सहहिस्सेदार याचा विचार करता सदर मिळकतींमधून सामनेवाला यास बरेच आर्थिक उत्पन्न मिळत असेल ही बाब सकृतदर्शनी शाबीत होत नाही.

११. त्याचप्रमाणे अर्जदार हिने सामनेवाला यास खाजगी नोकरीद्वारे प्रतिमहा रक्कम रू.२०,०००/— उत्पन्न असल्याचे कथन केले आहे. उलटपक्षी सामनेवाला याने त्यास आर्थिक उत्पन्न रक्कम रू.१०,०००/— प्रतिमहा असल्याचे व तो अर्जदार हिला अंतरीम आर्थीक मदत देण्यास तयार असल्याचे देखील कथन केले आहे. जरी सामनेवाला याने मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र हजर केले नसले तरी सामनेवाला यास रक्कम रू. २०,०००/— इतके मासिक उत्पन्न आहे हे दर्शविण्यासाठी अर्जदार हिने कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही.

१२. वर नमुद परिस्थिती जरी असली तरी पती या नात्याने अर्जदार हिचेसाठी प्रतिमहा काही आर्थिक मदत देणे हे सामनेवाला याचे नैतिक कर्तव्य व जबाबदारी आहे. सामनेवाला याने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याच्यावर त्याच्या आईची जबाबदारी असलेचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला हा मुंबई येथे रहाणेस असल्यामुळे त्यास येणा—या आर्थीक खर्चाचा देखील सकृतदर्शनी विचार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला याने अर्जदार हिला तो मदत देणेस तयार असलेबाबत कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार ही देखील कामे मिळवून व करून पैसे मिळविण्यास शारिरीक व मानसिक दृष्टया समक्ष आहे. सबब अर्जदार हिचा संपूर्ण आर्थिक खर्च सामनेवाला याने उचलणे अपेक्षीत नाही.

१३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालय यांनी **रजनेश विरूध्द नेहा क्रिमिनल अपिल क्र.७३०/२०२०** मध्ये नमुद केल्याप्रमाणे पत्नीने पतीच्या जीवनशैलीनुसार व पतीला मिळणा—या आर्थिक उत्पन्नानुसार तिचे दैनंदिन

व मासिक खर्च नियोजीत करणे अपेक्षीत आहे. सबब अर्जदार हिने सकृतदर्शनी सामनेवाला याला रक्कम रू.२०,०००/— इतके मासिक उत्पन्न आहे असा कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर न आणल्याने अर्जदार ही म्हणते त्याप्रमाणे ती प्रतिमहा आर्थिक मदत मिळविण्यास पात्र नाही. परंतु सामनेवाला याचे आर्थिक परिस्थितीचा विचार करता अर्जदार हिच्या दैनंदिन गरजा व वैद्यकीय गरजा विचारात घेता अर्जदार हिला रक्कम रू.३,०००/— अंतरीम आर्थिक मदत सामनेवाला याचेकडून मिळविण्यास अर्जदार पात्र आहे. सबब वर नमुद कारणांचा विचार करून विचारार्थी मुद्दा क्र.१ करिता निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे—

## आ दे श

१. अर्ज नि.०६ अशंत: मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला याने अर्जदार हिला अंतरीम आर्थिक मदत म्हणून दरमहा रक्कम रू.३,०००/— प्रस्तुतचा नि.०६ कडील अर्ज दाखल तारखे पासून ते मूळ अर्ज निकाली निघेपर्यंत दर महिन्याच्या ५ तारखेला द्यावी.

३. अर्जदार हिने पुढील तारखेस तिच्या चालू बॅक खात्याचे वर्णन अभिलेखावर दाखल करावे. सामनेवाला याने सदर वर्णनाची नोंद घ्यावी.

४. सदर आदेशाची प्रत गुहागर पोलीस ठाणे व संरक्षण अधिकारी, गुहागर यांना देण्यात यावी.

५. सदर आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी.

६. अर्जाचा खर्च उभय पक्षकारांनी सोसावा.

दिनांक :— २९/०२/२०२४.

(एम. आर. काळे)
प्रभारी न्यायदंडाधिकारी वर्ग—१,
गुहागर.